# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७, २७५७८४०९
फॅक्स : २७५७ ०९६१, २७५७ १६६६.
वेबसाईट : mahamjp.com


क्र.मजीप्रा/२०१२/सभा-१२३/(४१)/आ.४ दिनांक : ८.५.२०१२

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि.२९.३.२०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२३व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुरवार दि.२९.३.२०१२ रोजी झालेल्या १२३व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सोबत : १२३ व्या सभेचे इतिवृत्त
पृ.क्र. १ ते २३

आपला विश्वासू,

(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी


लिपिक
राज्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा व संरक्षण आणि सार्वजनिक बांध यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

Government of Maharashtra Public Health Department Mantralaya, Mumbai

M.J.P. Mumbai-21 Received

राज्यमंत्री, नगरविकास, वने, बंदरे, खार जमीन, संसदीय कार्य, क्रीडा व युवक कल्याण व माजी सैनिक कल्याण, विधी व न्याय आणि राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपिक
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे कार्यालय मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

P. A. to Secretary
Water Supply and Sanitation Department,
Mantralaya, Mumbai - 400 032

मुख्यमंत्र्यांचे सचिवालय
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रत :

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. जलव्यवस्थापन, ठाणे,/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे, /अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक, /नागरी व ग्रामीण योजना, ठाणे / मध्यवर्ती नियोजन, मित्तल टॉवर्स, मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबं क्र.८,९ व आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१ व ३ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

2. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई,
वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.३,११ व १५ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

3. अधीक्षक अभियंता (मु.) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

4. कार्यकारी अभियंता (तां.श.) म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
आपल्या शाखेशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.४, ५, १० व आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र. ४,५ व ६ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

5. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) मजीप्रा., नवी मुंबई.

6. उप सचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,

7. आस्थापना अधिकारी (दक्षता) मजीप्रा, नवी मुंबई,
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ७, १२अ, १२ब, १३, १४ आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २ व आयत्यावेळेची इतर चर्चा क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

8. प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई,

9. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

10. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्थापना- ) / कार्यासन अधिकारी (आ- ) यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

11. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.३१.५.२०१२पर्यंत सादर करावा.

(२)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२३ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२३ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक २९/०३/२०१२ रोजी संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते:-

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री. जयंत पाटील, मा मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि. म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
५. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते:-

१. श्री.पंजाबराव वानखडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
२. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, नवी मुंबई.
३. श्री. एन.एस. केरकर, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
४. श्री. व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन व सल्लागार सेवा, पुणे.
५. श्री. बी.के. सवई, मुख्य अभियंता (प्रभारी), म.जी.प्रा., मध्यवर्ती नियोजन, नवी मुंबई.
६. श्री. के.एम. विधाते, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री. बी.एस. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी (२), म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. श्री. एस.एस. चव्हाण, अधीक्षक अभियंता, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, नागपूर.
९. श्री. एन.एम. तेजाळे, अधीक्षक अभियंता (यां), म.जी.प्रा., नागपूर.
१०. श्री. सी.आर.गजभिये, अधीक्षक अभियंता, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२२ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

दिनांक २३.११.२०११ रोजी संपन्न झालेल्या १२२ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ :**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२२ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२३.११.११ रोजी संपन्न झालेल्या १२२ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. १२२ व्या बैठकीत कार्यक्रम बाब क्र.५ मधील झालेल्या निर्णयानुसार मित्तल टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई येथील २८४२ चौ. फू. जागा दि.१/१२/२०११ रोजी भाडयाने घेण्यात आली आहे. सदर जागेमध्ये मुख्य अभियंता (मध्यवर्ती नियोजन), माहिती तंत्रज्ञान कक्ष, अधीक्षक अभियंता, गुणवत्ता परीक्षण पथक व प्रशासनाचे दोन कक्ष कार्यरत आहेत. तथापि, सदर जागा ही अपुरी पडत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणले व महत्वाच्या पदावर काम करणारे अधिकारी हे सदस्य सचिव यांच्या कार्यालयात किंवा जवळपास असणे गरजेचे असल्याचे मत मांडले. सदस्य सचिव यांचे कार्यालय किंवा मंत्रालयाजवळ आणखी वाढीव जागा आवश्यक असल्याचे सांगितले. त्यावर मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी सूचित केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा वित्त विभाग सध्या सिडको भवन, नवी मुंबई येथे कार्यरत आहे हा वित्त विभाग सुध्दा सदस्य सचिव यांच्या कार्यालयात किंवा जवळपास आणणे गरजेचे आहे. याबाबत संचालक मंडळात सविस्तर चर्चा होऊन कार्यालयाकरिता आवश्यक वाढीव जागा सदर निविदेत मान्य दराने इतर मालक जागा देण्यास तयार असतील त्यांचेकडून भाडयाने घेण्याचा निर्णय झाला व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ३ :**

**विषय** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०११-१२ चे सुधारित अंदाज व सन २०१२-१३ चे वार्षिक अंदाज.

सदस्य सचिव, यांनी मजीप्राचे सन २०११-२०१२ चे सुधारित अंदाज व सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज संचालक मंडळासमोर सादर केले. सन २०११-१२ या वर्षाच्या मुळ अंदाजपत्रकात ८२.८३ कोटी तुट दर्शविण्यांत आली होती. ती तुट सन २०११-१२ मध्ये सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकी अदा करण्यांत येईल असे गृहीत धरुन विचारात घेतली होती. मात्र थकबाकी अदा करता आली नाही. शिवाय सप्टेंबर २०११ पासून पाणीपट्टी व इतर वसुलीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ करण्यांत आली. परिणामी सन २०११-१२ च्या सुधारीत अंदाजपत्रक रु.१.०२ कोटीचे अधीक्य दर्शविते. सदस्य सचिव यांनी असेही नमुद केले की, वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन आता स्वबळावर अदा करण्यांत येत असून यासाठी आता योजनेचा निधी वापरला जात नाही. सन २०१२-१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज रु.१४.२१ कोटी अधीक्याचे राहील असेही सदस्य सचिव यांनी स्पस्ट केले. यावर चर्चा होवून संचालक मंडळाने पुढील प्रमाणे ठराव संमत केला.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, प्राधिकरणाने सन २०११-१२ चे सुधारित अंदाज व सन २०१२-१३ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यांत येत आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | तपशील | सन २०११-१२ चें सुधारित अंदाज | सन २०१२-१३ चे अंर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ४६६२९.०३ | ५४२१३.२२ |
| २ | महसुली खर्च | ४६५२७.४७ | ५२७९२.५५ |
| ३ | भांडवली जमा | १६८८४२.७९ | १४९७४९.८९ |
| ४ | भांडवली खर्च | १६८८४२.७९ | १४९७४९.८९ |

ज्या नगरपालिकांना OTS अंतर्गत अंदाजपत्रकातील तरतुदींव्दारे कर्ज परतफेडीस शासनाकडून मदत होत आहे अशा नगरपालिकांची भविष्यातील भांडवली स्वरुपाची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्याबाबत शासनास विनंती करण्यांत यावी.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पुरेसे काम नसल्याने निवृत्तीवेतनाचा खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही म्हणून हा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून अनुदान स्वरुपात सहाय्य मिळण्याबाबत शासनास विनंती करण्यांत यावी.

सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा केल्यानंतर संचालक मंडळाने कार्यक्रम बाबीस मान्यता दिली असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ४:**

**विषय:** अहस्तांतरीत मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविल्या जाणाऱ्या तोट्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा केंद्रांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्राच्या मालकीची एकूण २५ नागरी पाणी पुरवठा केंद्रे असून, अहस्तांतरित मात्र मजीप्रामार्फत चालविण्यात येणाऱ्या ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्यात येते. या ३० योजनांपैकी १२ योजना या मा. संचालक मंडळाच्या मान्यतेने व उर्वरित १८ योजना तत्कालीन परिस्थितीनुसार शासनाच्या आदेशान्वये वा इतर करणाने चालविल्या जात आहेत.

नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत स्वयंसंतुलित होण्यासाठी दरवर्षी खर्चाचा व उत्पन्नाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पाणीपट्टीत वाढ प्रस्तावित करुन मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर मंजूर अधिसुचनेनुसार सुधारित दर लागु केले जातात. सदरची दरवाढ प्रणाली ही pooled rate धर्तीनुसार परिगणीत केली जाते. त्यामुळे या योजना एकंदरीत तोट्यात चालविल्या जात नाहीत.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

२७/५

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

तथापि, ग्रामीण योजनांचा आढावा घेतला असता, त्यातील काही योजना या कोणत्याही उपाययोजना केल्या तरी, तोट्यातच चालतील वा चालवाव्या लागतील, असे दिसून येत आहे. सन २०११-१२ मध्ये या योजनांसाठी सुमारे १३.२५ कोटी रुपये तोटा मजीप्रास होत असल्याचे दिसून येत आहे. या योजना स्वयंसंतुलित होण्यासाठी प्रचलित दरात २०० ते ३०० % इतकी वाढ करावी लागेल जी केवळ अशक्य बाब आहे.

अशा परिस्थितीत एकतर सदर तोट्याची रक्कम शासनाने उपलब्ध करुन द्यावी **अथवा** ज्या योजना तोट्यात आहेत, त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्यास वा त्या हस्तांतरीत करुन घेतल्या नाहीत तर बंद करण्याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. संचालक मंडळात चर्चा होऊन योग्य ते निर्णय घेण्याची विनंती मा. सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास केली.

या अनुषंगाने सदर प्रस्तावावर मा. संचालक मंडळात सविस्तर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, ज्या ग्रामीण योजना तोट्यात चालवाव्या लागतात अशा योजनांच्या तोट्टयाची रक्कम शासनाने उपलब्ध करुन द्यावी अथवा ज्या योजना तोट्यात आहेत, त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्यास वा त्या हस्तांतरीत करुन घेतल्या नाहीत तर बंद करण्याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ५**

**विषय :** UIDSSMT अंतर्गत गोंदिया वाढीव पाणी पुरवठा योजना १० % लोकवर्गणी व अतिरिक्त खर्चाचे जबाबदारीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

सदरची योजना ही मजीप्राच्या मालकीच्या २५ पाणी पुरवठा केंद्रांपैकी असलेल्या गोंदिया पाणी पुरवठा योजनेचाच एक भाग असून, सदर पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती एप्रिल १९७८ पासून मजीप्रातर्फे करण्यात येत आहे. त्यामुळे वाढीव योजनेची लोकवर्गणी रु. ६१३.८३ लक्ष मजीप्राने भरुन मजीप्राची योजना म्हणून राबविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचालक मंडळाच्या दि.२९.०९.२०१० रोजी संपन्न झालेल्या ११८ व्या बैठकीत घेण्यात येऊन मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार योजनेचे कार्यान्वयन व ३० वर्षासाठी दैनंदिन देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्याबाबतचा करारनामा दि. १७.९.२००९ रोजी करण्यात आल्यानंतर योजनेचे कार्यान्वयन मजीप्रामार्फत प्रगतीपथावर आहे.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार या मान्यतेमध्ये केवळ योजनेंतर्गत समाविष्ट उपांगांच्या निव्वळ किंमतीनांच मान्यता प्रदान केली आहे. ज्यामध्ये संभाव्य भाववाढ, ई अॅन्ड पी, भू-संपादन, कर्मचारी निवासस्थाने इ. पोटीच्या खर्चाचा समावेश नाही. त्याचप्रमाणे प्रत्यक्षात योजनेला विलंबाने मंजुरी मिळाल्यामुळे योजनेच्या किंमतीत वाढ झाली असून, सद्यःस्थितीत योजनेची एकूण किंमत रु. ८३३४.१७ लक्ष इतकी होत आहे.

त्यानुसार योजेनचे आर्थिक विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे. **(रु. लाखात)**

| | | |
|---|---|---|
| १. | योजनेची किंमत | रु. ६१३८.२९ |
| २. | मुल्यवर्धीत किंमत चालू दरसुचीनुसार | रु. ७९५८.६५ |
| ३. | मुल्यवर्धीत किंमतीच्या जास्त दराने स्विकृत केलेल्या निविदेची फरकाची रक्कम | रु. ३७५.५२ |
| | **एकूण (२+३)** | **रु. ८३३४.१७** |

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि. ३१.८.२००९ च्या शासन निर्णयाद्वारे दरसुचीतील फरकामुळे अंदाजपत्रकीय किंमतीत होणाऱ्या वाढीपैकी ५०% रक्कम राज्य शासन पूरक अनुदान म्हणून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या शासन निर्णयात परिशिष्ट-२ मधील अनुक्रमांक. ९३ मध्ये या योजनेचा समावेश आहे. म्हणजेच या योजनेसही सदर शासन निर्णय लागु आहे. त्यानुसार वाढीव रु. १८२०.४० लक्षच्या ५०% म्हणजे रु. ९१०.२० लक्ष इतके शासकीय अनुदान उपलब्ध होणार आहे. त्याचप्रमाणे या शासन निर्णयाच्या पृष्ठ - ४ वरील मुद्दा क्र. २ च्या बाब क्र. II नुसार उर्वरित ५०% रकमेची मागणी केल्यास, MUIDCL या शासनमान्य वित्तीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध होणार आहे.

यानुसार पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

१. दरसुचीच्या फरकामुळे येणाऱ्या रकमेच्या ५०% येणारी रक्कम रु.९१०.२० लक्ष शासकीय अनुदान म्हणून उपलब्ध करुन घेण्यात येईल.
२. उर्वरित ५०% येणारी रक्कम रु. ९१०.२० लक्ष MUIDCL या शासनमान्य वित्तीय संस्थेकडून कर्ज म्हणून उपलब्ध करुन घेता येईल.
३. रु.६१३.८३ लक्ष लोकवर्गणीबरोबरच जास्त दराच्या निविदा स्वीकृत केल्यामुळे येणारे रु. ३७५.५२ लक्ष इतके जादा अधिक्य म्हणजेच, एकूण रु. ९८९.३५ लक्ष मजीप्रास अन्य मार्गाने म्हणजेच स्वनिधीतुन वा कर्जातुन उपलब्ध करावे लागेल.
४. मुद्दा क्र.२ मध्ये नमूद MUIDCL कडून कर्जरुपी रु.९१०.२० लक्ष व मुद्दा क्र. ४ नुसार रु.९८९.३५ लक्ष असे एकुण रु. १८९९.५५ लक्ष दायित्व मजीप्रास स्वीकारावे लागणार आहे.

या अनुषंगाने सदर प्रस्तावावर मा. संचालक मंडळात चर्चा होऊन मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु.व स्व. | सदस्य सचिव<br>म.जी.प्रा. |

ठराव

असा ठराव करण्यात येतो की,

१. गोंदिया वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता १०% लोकवर्गणी रु. ६१३.८३ लक्ष भरण्याकरीता तसेच योजनेचे बांधकाम पूर्ण होण्याकरीता दरसुचीच्या फरकाच्या रक्कमेच्या ५० % म्हणजे रु. ९१०.२० लक्ष अनुदान शासन व MUIDCL कडून रु. ९१०.२० लक्ष कर्ज उपलब्ध करुन घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. रु.६१३.८३ लक्ष लोकवर्गणीबरोबरच जास्त दराच्या निविदा स्वीकृत केल्यामुळे येणारे रु. ३७५.५२ लक्ष इतके जादा अधिक्य म्हणजेच, एकूण रु. ९८९.३५ लक्ष स्वनिधीतुन वा कर्जातुन उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

कार्यक्रम बाब क्र.:६

**विषय :** मजीप्रा चालवित असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मा. संचालक मंडळाच्या दि.२८.६.२०११ रोजी संपन्न झालेल्या १२१ व्या बैठकीत web based billing software विकसीत करण्याच्या सादर केलेल्या प्रस्तावास मा. संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

तथापि, web based billing software प्रणाली विकसीत न करता, सर्वसमावेशक सेंट्रलाईज्ड वेबबेस्ड पाणी व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्यास उचित ठरेल असे अभ्यासांती दिसून आल्याने तसा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा. संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्याचबरोबर यासाठी येणारा एकूण खर्च सुजल-निर्मल अभियानांतर्गत मंजूर १७ योजनांमधील तरतुदीतुन करण्यात येईल. तथापि, अधिकचा खर्च होत असल्यास, तसा प्रस्ताव शासनास पाठवुन निधी उपलब्ध करुन घेण्यात येईल असेही संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

या अनुषंगाने सदर प्रस्तावावर मा. संचालक मंडळात चर्चा होऊन मान्यतेअंती पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्राच्या मालकीच्या २५ पाणी पुरवठा केंद्रांसाठी सर्वसमावेशक सेंट्रलाईज्ड वेबबेस्ड पाणी व्यवस्थापन प्रणाली विकसीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत असून, त्यासाठीचा खर्च सुजल-निर्मल अभियानांतर्गत मंजूर १७ योजनांमधील तरतुदीतुन करण्यास व अतिरिक्त खर्च होत असल्यास तसा प्रस्ताव शासनास पाठवुन निधी उपलब्ध करुन घेण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे व या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

४१८

(२)

**कार्यक्रम बाब क्र. ७ :**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामकाज पुनर्रचनेनंतर व्यावसायिक तज्ञ सल्लागारांची नियुक्ती करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीवर मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

दि.३/११/११ पासून म.जी.प्रा. च्या कामामध्ये अंतर्गत बदल करुन प्रत्येक विभागाचे कामाचे स्वरुप व कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर केलेले आहे. म.जी.प्रा. च्या प्रत्येक विभागास व्यवसायिक स्वरुप आणून जनतेस अधिक चांगली सेवा उपलब्ध करुन देणे, प्राधिकरणाची आर्थिक स्थिती सक्षम करणे या बाबींसाठी वित्त शाखा, प्रकल्प व्यवस्थापन व जलव्यवस्थापन या तीन विभागांकरिता त्या त्या क्षेत्रातील खाजगी सल्लागार/तज्ञ व्यक्तींची नेमणूक ठराविक रकमेवर प्रथमतः ११ महिन्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास विषद केले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन मान्यतेअंती पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>ठराव</u>

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्राच्या प्रत्येक विभागास व्यावसायिक स्वरुप आणून जनतेस अधिक चांगली सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी व मजीप्राची आर्थिकस्थिती सक्षम होण्याकरिता (१) वित्त शाखा,(२) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा व (३) जलव्यवस्थापन तसेच आय.टी. सेल यांसाठी प्रथमतः ११ महिन्याच्या कालावधीकरिता खाजगी सल्लागार/तज्ञ व्यक्तींची ठराविक रक्कमेवर नेमणूक करणे व आवश्यकतेनुसार कराराचा कालावधी वाढविणे अशी कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ८ :**

**विषय :** पुणे येथील लष्कर पाणी पुरवठा योजना केंद्रातील PPP कराराअंतर्गत विकासकाला द्यावयाच्या जमिनीबाबत.

सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास वरील कार्यक्रम बाबीबाबत अवगत केले की, पुणे शहरात म.जी.प्रा. ची स्वतःची प्रशासकीय इमारत व निवासस्थाने, विश्रामगृह असावे या उद्देशाने म.जी.प्रा. च्या दि.१३/१२/०७ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सदर जागा विकासकाला बांधकाम करण्यास उपलब्ध करुन दिली. तथापि, विकासकाला देण्यात आलेली जागा ही तांत्रिकदृष्टया योग्य नसल्याने त्यांनी मुख्य अभियंता निवासस्थानाच्या मागील बाजूस रिक्त असलेली ३०X३० मिटर जागा उपलब्ध करुन देण्यास विनंती केली आहे. याबाबत चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव करण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

२७/५

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

(९०)

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, सदर जागेबाबत विकासकास जितकी जागा करारापेक्षा कमी मिळाली तितकी जागा मुख्य अभियंता यांचे निवासस्थानामागील जागेतून द्यावी. तथापि, या जागेवर विकासकास जितके बांधकाम अनुज्ञेय असेल तितकेच बांधकाम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासही त्याने करुन द्यावे. त्याचप्रमाणे एकच इमारत बांधल्यास या बांधकामात विकासक व म.जी.प्रा. समान चटईक्षेत्र वापरतील.

कार्यक्रम बाब क्र. ९:

**विषय :** अ) मजीप्राच्या मालकीच्या (नागरी), न्हावा-शेवा प्रकल्प क्षेत्र व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दरात वार्षिक दरवाढ करण्याबाबत.

ब) मजीप्रा चालवित असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या पाणीपट्टी दरात वार्षिक दरवाढ करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी सादरीकरणाद्वारे प्रस्तावित दरवाढीबाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबींच्या अनुषंगाने सर्वंकष चर्चा झाली. सदर चर्चेत मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा व मा. मंत्री, ग्रामविकास तथा सह अध्यक्ष मजीप्रा यांनी, सदर पाणीपट्टी दरात काही प्रमाणात बदल प्रस्तावित करण्याचे निर्देशित केले ते पुढीलप्रमाणे आहेत.

नागरी पाणी पुरवठा केंद्र

१. नागरी पाणी पुरवठा केंद्रांतर्गत न्हावा-शेवा पा. पु. केंद्राच्या व प्रकल्प क्षेत्र (अंबरनाथ-बदलापूर) केंद्राच्या विद्यमान दरात केलेली १०% इतकी त्याचप्रमाणे प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्राच्या विद्यमान दरात केलेली १६% वाढ मान्य करण्यात येत आहे.

२. तथापि, घरगुती टेलिस्कोपिक दराच्या विद्यमान दरात पुढीलप्रमाणे वाढ करावी.
पाण्याचा वापर १५००० लि. साठी प्रस्तावित दर मान्य करण्यात येत असून, १५००१ ते २०००० पर्यंतच्या वापरासाठी १५००० लि. पर्यंतच्या दराच्या दीडपट, २०००१ ते २५००० पर्यंतच्या वापरासाठी १५००० लि. पर्यंतच्या दराच्या दुप्पट व २५००१ च्या पुढील पाण्याच्या वापरासाठी १५००० लि. पर्यंतच्या दराच्या चौपट इतकी वाढ करण्यात यावी.

३. तथापि, सन २०१३-१४ पासून पुढे दरवर्षी किमान १०% वाढ करावी. मात्र जेथे पाणी पुरवठा केंद्राच्या प्रत्यक्ष पृथःकरणाने जर १०% पेक्षा जास्त दरवाढ करावी लागत असल्यास, दर पृथःकरणाने येणाऱ्या टक्केवारीनुसार दरवाढ करावी व तसे प्रस्तावित करुन संचालक मंडळाची मान्यता घ्यावी.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने दर रचना प्रस्तावित करुन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनाः**

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी विद्यमान दरामध्ये प्रस्तावित केलेल्या १०% इतक्या सरासरी वाढीऐवजी घरगुती दरासाठी दरमहा रु. १००/- वा वार्षिक रु. १२००/- व बिगर घरगुती वापरासाठी घरगुती दराच्या चौपट म्हणजेच रु. ४००/- वा वार्षिक रु. ४८००/- अशी वाढ प्रस्तावित करावी.

**ठराव**

असा ठराव करण्यात येतो की,

अ) **नागरी पाणी पुरवठा योजना :-**

अ.१) असा ठराव करण्यात येतो की, न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे नमूद केल्याप्रमाणे दिनांक १/४/२०१२ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

**न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्र :-**

| क्र. | तपशिल | पाण्याचे दर (प्रति १००० लिटरसाठी) |
|---|---|---|
| | **घाऊक पाणी पुरवठा** | |
| १ | सिडको | रु. ७.०० |
| २ | जे.एन.पी.टी/सेज | रु. २०.०० |
| ३ | पनवेल नगरपालिका | रु. ९.०० |
| ४ | ग्रामपंचायती | रु. ३.०० |
| ५ | वरील वर्गवारी व्यतिरीक्त, हाऊसिंग प्रोजेक्ट, लघु उद्योग संस्था व इतर संस्था | |
| | अ) घरगुती | रु. १२.०० |
| | ब) बिगर घरगुती | रु. ६०.०० |

अ.२) असा ठराव करण्यात येतो की, प्रकल्प क्षेत्रा अंतर्गत अंबरनाथ बदलापूर, पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे नमूद केल्याप्रमाणे दिनांक १/४/२०१२ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| १. | **घाऊक पाणी पुरवठा** | |
| अ] | घरगुती | ९.०० |
| ब] | बिगर घरगुती | ३६.०० |
| २. | **विशेष ग्राहक** | |
| | आयुध निर्मित कारखाना | २०.०० |

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा वापर १५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ च्यापुढे |
|---|---|---|---|---|---|
| ३. | **किरकोळ पाणी पुरवठा** | | | | |
| | (i) घरगुती | ९.०० | १३.०० | १८.०० | ३६.०० |
| | (ii) बिगर-घरगुती | | | | ४२.०० |
| ४. | खाजगी दवाखाना, (बाहय रुग्ण दवाखाना) वैद्यकिय दुकान,किराणा अथवा घाऊक मालाचे दुकान | | | | २१.०० |
| ५. | शाळा, महाविदयालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | | | | २०.०० |

**[दोन] मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रति महा किमान दर रुपयात.**

ज्या नळ जोडणीवर मापनयंत्र बसविले असतील परंतू घर बंद असल्यामुळे, त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | उपरोक्त [४] व [५] मध्ये निर्विर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडणीस प्रति माह |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | १६९ | ३९४ | ७५७ |
| २० मिलीमिटर | ३०९ | ७२० | १३९८ |
| २५ मिलीमिटर | ४५४ | ८९५ | २०२७ |
| ३२ मिलीमिटर | ६७२ | १५६७ | ३००७ |
| ४० मिलीमिटर | ११६८ | २७२९ | ५२५१ |
| ५० मिलीमिटर | १४८३ | ३४३६ | ६६४३ |
| ६५ मिलीमिटर | १८१५ | ४२२३ | ८१५० |

**[तीन] किमान आकार प्रति महा प्रति नळ जोडणीस [दर रुपयात]:**

सर्व नळजोडणीवर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्र बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यात यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

[रुपये]

| नळजोडाचा व्यास | घरगुती | उपरोक्त एक [४] व [५] मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिलीमिटर | २३० | ४५४ | १००४ |
| २० मिलीमिटर | ३९४ | ७८६ | १७७८ |
| २५ मिलीमिटर | ८१० | १६२१ | ३६३० |

अ ३ ) असा ठराव करण्यात येतो की, प्रकल्प क्षेत्रा बाहेरील पाणी पुरवठा केंद्रातुन होणाऱ्या पाणी पुरवठयाचे दर पुढे नमूद केल्याप्रमाणे दिनांक १/४/२०१२ पासून अथवा सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[एक] जलमापक यंत्राद्वारे पाणी पुरवठा

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | तपशिल | पाण्याचा दर |
|---|---|---|
| १. | **घाऊक पाणी पुरवठा** | |
| अ] | **घरगुती** | |
| i] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके परस्पर भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | ६.०० |
| ii] | महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाकडे वीज देयके न भरणा-या नगरपालिकांना केलेला घाऊक पाणी पुरवठा | १२.०० |
| iii] | मुख्य वितरण नलिकेतून प्रतिमहा २ द.ल.लिटर पेक्षा जास्त पाणी घेणारे ग्राहक | १२.०० |
| iv] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक घरगुती पाणी पुरवठा | ६.०० |
| ब] | **बिगर घरगुती** | |
| i] | बिगर घरगुती घाऊक | ६०.०० |
| ii] | ग्रामीण भागासाठी [ग्रामपंचायत व जिल्हा परिषद] घाऊक बिगरघरगुती पाणी पुरवठा | २८.०० |
| क] | **विशेष ग्राहक** | |
| | **लष्करी कारखान्यांना केलेला शुध्द पाणी पुरवठा** | |
| अ] | अंबाझरी | २४.०० |
| ब] | ओझर | २४.०० |
| क] | अणुशक्ती केंद्र तारापूर | २४.०० |

(पाण्याचे दर रुपयात प्रती १००० लिटर)

| अ. क्र. | | तपशिल | पाण्याचा वापर १५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर १५००१ ते २०००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २०००१ ते २५००० लि. पर्यंत | पाण्याचा वापर २५००१ लि. व त्यापुढे |
|---|---|---|---|---|---|---|
| (२) | | **किरकोळ पाणी पुरवठा** | | | | |
| अ] | | **घरगुती** | | | | |
| | (i) | निवासस्थाने | १३.०० | १९.०० | २६.०० | ५२.०० |
| | (ii) | ग्रामीण भागासाठी किरकोळ घरगुती पाणी पुरवठा | ६.०० | ९.०० | १२.०० | २४.०० |

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ब] | | **बिगर घरगुती** | | | | |
| | (i) | क वर्ग नगरपालिकेला क्षेत्राशिवाय इतर, नगरपालिका क्षेत्रात केलेला बिगर घरगुती पाणी पुरवठा | | | | ६०.०० |
| | (ii) | क वर्ग नगरपालिका क्षेत्रात २ द.ल.लि. पर्यंत पाणी वापर करणा-या बिगर घरगुती ग्राहकासाठी पाणी पुरवठा | | | | ३७.०० |
| ब] | | **बिगर घरगुती** | | | | |
| | (i) | क वर्ग नगरपालिकेला क्षेत्राशिवाय इतर नगरपालिका क्षेत्रात केलेला बिगर घरगुती पाणी पुरवठा | | | | ६०.०० |
| | (ii) | क वर्ग नगरपालिका क्षेत्रात २ द.ल.लि. पर्यंत पाणी वापर करणा-या बिगर घरगुती ग्राहकासाठी पाणी पुरवठा | | | | ३७.०० |
| (३) | | शाळा, महाविद्यालय, धर्मादाय संस्था, सरकारी व निमसरकारी कार्यालय, सरकारी रुग्णालय यासारख्या ना नफा ना तोटा तत्वावर चालणा-या संस्थाना केलेला पाणी पुरवठा | | | | २५.०० |
| (४) | | **गिरीस्थाने** | | | | |
| | (i) | **घरगुती** | १४.०० | २१.०० | २८.०० | ५६.०० |
| | (ii) | **बिगर घरगुती** | | | | |
| | (a) | अ वर्ग हॉटेल्स | | | | १११.०० |
| | (b) | ब वर्ग हॉटेल्स | | | | ८८.०० |
| | (c) | क वर्ग हॉटेल्स | | | | ७४.०० |
| | (d) | इतर | | | | ७४.०० |

**[दोन] मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यासाठी प्रति महा किमान दर रुपयात.**

ज्या नळ जोडणीवर मापनयंत्र बसविले असतील परंतू घर बंद असल्यामुळे त्या बंद करण्याबाबत कळविले असेल अशा, तसेच ज्या ग्राहकांकडून वसुल करावयाचे मासिक आकार खाली दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा कमी असेल अशा ग्राहकांच्या बाबतीत खालील किमान आकार आकारण्यात यावे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, प्रा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[रुपये]

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | | उपरोक्त [३] मध्ये निर्विर्दिष्ट केलेल्या संस्थांसाठी प्रति नळ जोडणीस प्रतिमाह | किरकोळ बिगर घरगुती प्रति नळ जोडणीस प्रति माह |
|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | | |
| १५ मिलीमिटर | १२७ | ६४ | २६८ | ६२५ |
| २० मिलीमिटर | २६२ | १२२ | ५३० | १२३७ |
| २५ मिलीमिटर | ४९२ | २३६ | १०५३ | २४८२ |
| ३२ मिलीमिटर | ७४७ | ३५७ | १५६९ | ३८२८ |
| ४० मिलीमिटर | १०१५ | ४७२ | २१०५ | ४९४५ |
| ५० मिलीमिटर | १२७६ | ५८७ | २६१० | ६१९५ |
| ६५ मिलीमिटर | १६२० | ७५३ | ३४०७ | ८०५१ |

**[तीन] मापन यंत्र बसविण्यात आलेल्या गिरीस्थानक जोडण्या प्रति महा प्रति जोडणी दर रुपयात:**

| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह | | | इतर ग्राहकांना बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळ जोडणीस प्रति माह |
|---|---|---|---|---|---|
| | | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग | |
| १५ मिली मिटर | १४७ | १३२७ | ९९५ | ८११ | ६२५ |
| २० मिली मिटर | २६८ | २५७७ | १९१४ | १३७८ | १२४४ |
| २५ मिली मिटर | ५२३ | ५१६२ | ३८२८ | २९२२ | २४८२ |
| ३२ मिली मिटर | ७२७ | ७८०९ | ५८९५ | ४३७६ | ३८२८ |
| ४० मिली मिटर | १०५३ | ९७३० | ७६६३ | ५६७८ | ४९४५ |
| ५० मिली मिटर | १३७८ | १२९७१ | ९५८२ | ७०५० | ६२०१ |
| ६५ मिली मिटर | १७८६ | १६९५२ | १२३७७ | ९१६१ | ८०५१ |

**[चार] किमान आकार दर प्रतिमाह प्रति जोडणी रुपयांत.:**

सर्व नळजोडणीवर मापनयंत्र असावेत मात्र जेथे मापनयंत्रं बसविलेले असतील परंतू तीन महिन्यापेक्षा अधिक काळ चालू स्थितीत नसतील अशा प्रकरणी व मागील तीन महिन्याचे सरासरी देयक खालील किमान आकारापेक्षा कमी असेल, पुढे दर्शविल्या प्रमाणे किमान आकार आकारण्यांत यावेत. तीन महिन्यांचे सरासरी देयक किमान आकारापेक्षा अधिक होत असल्यास सरासरी देयक आकारण्यात यावेत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

[रुपये]

| नळ जोडणीचा व्यास | घरगुती | उपरोक्त एक [३] मध्ये नमुद केलेल्या ना नफा तत्वावर चालणा-या या सस्थांसाठी | बिगर घरगुती |
|---|---|---|---|
| १५ मिली मिटर | ३८३ | ५८७ | १४७४ |
| २० मिली मिटर | ५८७ | ११६८ | २९४७ |
| २५ मिली मिटर | ११३५ | २९४७ | ५९२० |

**[पाच] गिरीस्थानकासाठी किमान आकार प्रति माह प्रति नळ जोडास [दर रुपयात]:**

| नळजोडणीचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रति नळजोडणीस प्रति माह | | बिगर घरगुती वापरासाठी प्रति नळजोडणीस प्रति माह | | |
|---|---|---|---|---|---|
| | शहरी | ग्रामीण | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
| १५ मिली मिटर | ३१९ | १४० | ३०९५ | २२८४ | १८०६ |
| २० मिली मिटर | ६२५ | २७५ | ६६३५ | ४९७० | ३७३३ |
| २५ मिली मिटर | १२३७ | ५३६ | ११९७६ | ८९९० | ७०८२ |

**[सहा] मापनयंत्र विरहित सार्वजनिक नळ खांब्याच्या जोडण्यासाठी किमान आकार:**

अ]

| | | | |
|---|---|---|---|
| अ | १५ मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. २३६० प्रति माह |
| ब | २० मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. ५६७८ प्रति माह |
| क | २५ मिली मिटर | सार्वजनिक नळ खांब | रु. १२१७२ प्रति माह |

**ब)** जेथे सार्वजनिक नळ जोडणीस मापनयंत्र बसविण्याची व देखभालीची जबाबदारी ही मालकाची असेल, बसविलेले मापनयंत्र तीन महिन्यापेक्षा अधिक काळ ना दुरुस्त असतील तर मागील तीन महिन्याचे सरासरी वापर किंवा मापनयंत्र नसलेल्या सार्वजनिक खांबापैकी जास्त असेल ते बील आकारण्यात येईल.

वरील सर्व पाणी पुरवठा क्षेत्राच्या अनुषंगे खालील बाबी लागु रहातील.

१. **सार्वजनिक नळ खांब :-** सध्या सार्वजनिक नळ खांबे नाहीत, आणि यापुढे नवीन नळ खांब मंजूर करण्यात येऊ नये.

२. **नवीन ठोक पाणी पुरवठा-** नवीन ठोक पाणी पुरवठाच्याबाबत, ग्राहक, किमान तीन महिन्याच्या पाणी मागणी आकारणी इतके सुरक्षा अनामत रक्कम प्राधिकरणास नळ जोडणी घेताना येईल.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

३. **कमीत कमी पाणी आकारणी-** कमीत कमी पाणी आकाराबाबत करार पत्रकात नोंद असेल.

४. **मुख्य गुरुत्ववाहिनी नळ जोडणी -** मुख्य गुरुत्ववाहिनीवरील नळ जोडणीचा खर्च भागविण्याची व त्या नळ जोडणीच्या देखभाल दुरुस्तीची पूर्ण जबाबदारी ठोक पाणी घेणाऱ्या ग्राहकाची राहील.

५. **ठोक पुरवठयासाठी किमान आकार-** ठोक पुरवठयाच्या बाबतींत किमान मासिक आकार दरमहा २ दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठयासाठी प्रत्येक जोडणीमागे घेण्यात येणाऱ्या आकारापेक्षा कमी असता कामा नये.

६. **त्वरीत प्रदानाकरीता रिबेट -**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील विभाग ४४(अ) अन्वये देयक वितरीत झालेपासून १५ दिवसांचे आंत देयकाचे प्रदान ग्राहकाने करणे आवश्यक आहे. जे ग्राहक देयकाचे प्रदान १० दिवसांचे आंत करतील त्यांना देयकाच्या २% रिबेट देण्यात येईल.

२. ज्या ग्राहकाकडे थकबाकी नाही अशा ग्राहकांना पुढील बारा महिन्याचे अंदाजित आकार आगाऊ भरतील त्यांना आगाऊ भरलेल्या रक्कमेवर पाच टक्के सूट देण्यात येईल. अंदाजित देयके मागील दोन महिन्याच्या सरासरी वापरावर असेल.

७. **विलंब आकार -** जे ग्राहक देयक दिल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाण्याचे बील (थकबाकीसह) भरण्यास कसुर करील अशा ग्राहकांना देयक देण्यात आलेल्या दिनांकापासून १५ दिवसाचा कालावधीत संपेल त्या दिनांकापसून त्यांच्या सर्व रक्कमेवर (थकबाकीसह) दरमहा १ टक्का दराने विलंब शुल्क आकारण्यात येईल. ग्राहकांने सतत सहा महिने देयक (विलंब शुल्कासह ) भरणा करण्यास कसूर केल्यास त्याला होणारा पाणी पुरवठा बंद करण्यास तो पात्र ठरेल.

**ब) ग्रामीण पाणी पुरवठा योजना :-**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणामार्फत चालविण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतून होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या पाणीपट्टीचे दर हे घरगुती वापरासाठी दरमहा रु. १००/- वा वार्षिक रु. १२००/- त्याचप्रमाणे बिगर घरगुती वापरासाठी दरमहा रु. ४००/- वा वार्षिक रु. ४८००/- असे आकारावेत. मात्र प्रचलित दर हे या दरापेक्षा जास्त असल्यास त्यामध्ये १०% इतकी वाढ करावी. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी मिटरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे त्या ठिकाणच्या प्रचलित दरांमध्ये १०% इतकी वाढ करावी. यामध्ये या टक्केवारीने येणारा दर जर अपुर्णांकात म्हणजेच उदा.रु. १०.५० असा येत असल्यास तो रु.१०/- असा निश्चित करावा. या अनुषंगाने सदरचे दर दि. १.४.२०१२ पासून अथवा मा.सदस्य सचिव ठरवतील त्या दिनांकापासून आकारण्यात यावेत.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १०:**

**विषय :** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी १०% लोकवर्गणीचा निकष बदलणेबाबत शासनास शिफारस करणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत योजनांना केंद्र शासनाने लोकवर्गणी लागु केलेली नाही मात्र राज्य शासनाच्या दि.१७.३.२०१० च्या शासन निर्णयान्वये ४० लिटर दरडोई दरदिनी व त्यापेक्षा जास्त पाणी पुरवठ्याच्या योजनांना लोकवर्गणी लागू केली आहे. त्याचप्रमाणे दि. १ जुलै २०१० च्या शासन निर्णयान्वये ३ कि.मी. पुढील मुख्य पाईप लाईन. वाढीव अंतरामुळे पंपींग मशिनरीमध्ये करावी लागणारी वाढ आणि पुढील वाढीव अंत्तरामुळे ब्रेक प्रेशर टँकचा समावेश करणे यासाठीच्या खर्चासाठी १०% लोकवर्गणी लागू होणार नाही असाही निर्णय झाला आहे.

तथापि, या योजनांसाठी लागणारा कालावधी, भाववाढ, जादा दराच्या निविदा इ. मुळे योजनेच्या खर्चात वाढ होत असल्याने, वाढीव लोकवर्गणी उपलब्ध करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना अशक्य होते व परिणामी योजनांची कामे रखडतात. त्यामुळे लोकवर्गणीच्या मूळ तत्वाला बाधा न आणता, काही प्रमाणात लोकवर्गणीचा भार कमी होईल असे बदल करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळास अवगत केले. त्यासाठी जलकुंभापासुनची पुढील कामे जसे, जलकुंभ, वितरण व्यवस्था व अनुषंगिक कामे लोकवर्गणीसाठी ग्राह्य धरावीत. असे संचालक मंडळास अवगत करुन यावर योग्य तो निर्णय घेण्याची विनंती केली. या अनुषंगाने सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव**

असा ठराव करण्यात येतो की, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत योजनांना केंद्र शासनाने लोकवर्गणी लागु केलेली नाही मात्र राज्य शासनाच्या दि.१७.३.२०१० च्या शासन निर्णयान्वये ४० लिटर दरडोई दरदिनी व त्यापेक्षा जास्त पाणी पुरवठ्याच्या योजनांना लोकवर्गणी लागू केली आहे. त्याचप्रमाणे दि. १ जुलै २०१० च्या शासन निर्णयान्वये ३ कि.मी. पुढील मुख्य पाईप लाईन. वाढीव अंतरामुळे पंपींग मशिनरीमध्ये करावी लागणारी वाढ आणि पुढील वाढीव अंतरामुळे ब्रेक प्रेशर टँकचा समावेश करणे यासाठीच्या खर्चासाठी १०% लोकवर्गणी लागू होणार नाही असाही निर्णय झाला आहे. तथापि, या योजनांसाठी लागणारा कालावधी, भाववाढ, जादा दराच्या निविदा इ. मुळे योजनेच्या खर्चात वाढ होत असल्याने, वाढीव लोकवर्गणी उपलब्ध करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना अशक्य होते व परिणामी योजनांची कामे रखडतात. त्यामुळे लोकवर्गणीच्या मूळ तत्वाला बाधा न आणता, काही प्रमाणात लोकवर्गणीचा भार कमी होईल. त्यासाठी जलकुंभापासूनची पुढील कामे जसे, जलकुंभ, वितरण व्यवस्था व अनुषंगिक कामे लोकवर्गणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मंत्री मंडळाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करावा. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ११ :**

**विषय :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.२४/११/२०११ ते दि.१९/३/२०१२ पर्यंत केलेल्या अल्प व दिर्ष मुदतीच्या गुंवणुकीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर सविसार चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस मान्यत देण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, दि.२४/११/२०११ ते दि.१९/३/२०१२ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १२ :**

अ) नाशिक येथील संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे स्वायत्तीकरण करण्याबाबत.

सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास वरील कार्यक्रम बाबीबाबत अवगत केले. राज्य शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार झालेल्या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नाशिक येथील प्रशिक्षण व संशोधन केंद्र यशदा, पुणे या संस्थेंच्या धर्तीवर स्वायत्त करावयाचे असल्याबाबत मा. सदस्य सचिव यांनी सविस्तर विषद केले. याबाबत मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, सदर संस्थेस धर्मादाय आयुक्तांची नोंदणी व स्वायत्तता मिळण्याबाबतचे काम त्वरीत हाती घ्यावे तसेच यशदा, पुणे या संस्थेच्या धर्तीवर प्रस्तावित केल्यानुसार एक नियामक मंडळ व कार्यकारी समिती नेमण्यास मान्यता दिली व पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, राज्य शासनाच्या प्रशिक्षण धोरणानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नाशिक येथील प्रशिक्षण व संशोधन केंद्र यशदा, पुणे या संस्थेंच्या धर्तीवर स्वायत्त करण्याकरिता एक नियामक मंडळ व कार्यकारी समिती नेमण्यास मान्यता देण्यात येत असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

ब) संशोधन व प्रशिक्षण केंद्र नाशिक या संस्थेस अधिक प्रभावी व समर्पक नाव देण्याबाबत.

संशोधन व प्रशिक्षण केंद्र नाशिक या संस्थेस अधिक प्रभावी व समर्पक नांव देण्याबाबत आवाहन करण्यात आले होते. म.जी.प्रा.तर्फे काही नावे सूचविण्यात आली होती. म.जी.प्रा. तर्फे सूचविलेल्या चार नावापैकी **"MAHARASHTRA ENVIRONMENTAL ENGINEERING TRAINING & RESEARCH ACADEMY" (MEETRA)** या नावाला जास्तीत जास्त पसंती

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

देण्यात आल्याने संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या संस्थेस "MAHARASHTRA ENVIRONMENTAL ENGINEERING TRAINING & RESEARCH ACADEMY" (MEETRA) हे नाव देण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नाशिक येथील संशोधन व प्रशिक्षण केंद्र या संस्थेची ओळख एक राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था व्हावी यासाठी या संस्थेचे नाव बदलून "MAHARASHTRA ENVIRONMENTAL ENGINEERING TRAINING & RESEARCH ACADEMY" (MEETRA) या नवीन नांवास मान्यता देण्यात येत असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १३ :**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैद्यकिय विनियम १९८० रद्द करुन राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू असलेले महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्या अनुषंगाने निर्गमीत करण्यात आलेले वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपुर्ती संबंधातील शासन निर्णय जसेच्या तसेच लागू करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीवर सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले की, म.जी.प्रा. ने म.जी.प्रा. वैद्यकीय विनियम १९८० मध्ये लागू केले असून त्या नियमात अद्याप सुधारणा केली नाही. शासनाचे वैद्यकीय विनियम व म.जी.प्रा. चे वैद्यकीय विनियम यांचेमध्ये एकसुत्रीपणा असावा म्हणून सदरहू विनियम रद्द करुन शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेले महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय लाभ) नियम १९६१ व त्या अनुषंगिक निर्गमित केलेले शासन निर्णय, पत्रे व परिपत्रके जशीच्या तशी दि.१/४/२०१२ पासून लागू करण्यात यावीत असे अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम-६६ च्या अधिन राहून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय विनियम १९८० व त्यानुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/परिपत्रके /पत्रे रद्द करण्यात येत असून, यापुढे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेले महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने लागू केलेले सर्व शासन निर्णय /परिपत्रके जसेच्या तसे म.जी.प्रा.तील कर्मचाऱ्यांना दि.१/४/२०१२ पासून लागू करण्यात येत असून, पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १४ :**

**विषय :** दर्यापूर जि.अमरावती नगरपरिषद कडील मजीप्राकडे असलेल्या कर्मचा-यांस प्रतिनियुक्तींवर म.जी.प्रा.मध्ये कायमस्वरुपी समावून घेणे.

सदर कार्यक्रम बाबीवर सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले की, अमरावती जिल्हयातील दर्यापूर अंजनगाव व १५६ गावे या सामुहिक पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती म.जी.प्रा. ने करावी व योजनेवर कार्यरत असलेल्या दर्यापूर नगरपरिषदेचे कार्यरत असलेले २० कर्मचारी म.जी.प्रा. कडे प्रथमतः २ वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले. प्रतिनियुक्ती कालावधी संपल्यानंतर हे कर्मचारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियमित आस्थापनेवर सामावून घ्यावे असा निर्णय झाला व तसा करारनामा सुध्दा झाला आहे. त्यापैकी ३ कर्मचारी सेवा निवृत्त व ४ कर्मचारी मृत्त झाल्याने सध्या १३ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांना म.जी.प्रा.च्या आस्थापनेवर सामावून घेण्याबाबत कर्मचारी संघटना आग्रह धरीत आहेत. सदरचा प्रस्ताव म.जी.प्रा. चे विचाराधीन होता. सदर १३ कर्मचारी ज्या पदांवर कार्यरत आहेत ती पदे किंवा त्या पदांना समकक्ष पदे सध्या रिक्त असल्याने प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांना म.जी.प्रा. मध्ये कायमस्वरुपी सामावून घेणे शक्य असल्याबाबत संचालक मंडळास अवगत करण्यात आले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाने मान्यता देऊन पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, दर्यापूर नगरपरिषदेकडील म.जी.प्रा. कडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना म.जी.प्रा. च्या आस्थापनेवर कायमस्वरुपी विविध संवर्गातील रिक्त पदी तसेच समकक्ष पदी त्यांचा २ वर्ष प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर म्हणजे २००६ पासून सामावून घेणे तसेच निवृत्ती वेतन इत्यादी अनुषंगिक लाभ त्यांची सर्व जबाबदारी म.जी.प्रा.कडे राहिल. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

**कार्यक्रम बाब क्र. १५ :**

**विषय :** प्राधिकरणाचा सन २०१०-२०११ चा वार्षिक लेखा स्विकृत करणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबीवर सदस्य सचिव यांनी म.जी.प्रा. च्या सन २०१०-११ वर्षाच्या वार्षिक लेख्या बाबत संचालक मंडळास अवगत केले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळाने वार्षिक लेख्यांना मान्यता प्रदान करुन पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा. च्या सन २०१०-११ वर्षाच्या वार्षिक लेख्यास मान्यता देण्यात येत असून या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२९.०३.२०१२ रोजी होणा-या १२३ व्या सभेपुढील आयत्या वेळच्या कार्यक्रम बाबी.**

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१ :**

**विषय :** मजीप्राच्या मालकीची पाचगणी येथील गट नं.५४ व ५५ अंतर्गत दांडेघर पंपीग स्टेशनची ३० गुंठे जागा ३३ वर्षाकरीता भाडेपट्टयाने देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीवर सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले की, म.जी.प्रा. मालकीची पाचगणी येथील गट क्र.५४ व ५५ अंतर्गत दांडेघर पंपिंग स्टेशनची ३० गुंठे जागा आहे. सदर जागा दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन ३३ वर्षाकरिता भाडेपट्टयाने दिल्यास म.जी.प्रा. स कांही प्रमाणात आर्थिक लाभ होईल. यावर मा. अध्यक्षांनी असे सूचित केले की, सदर जागेवर म.जी.प्रा. च्या मालकीचे विश्रामगृह बांधावे. जेणे करुन त्यामधून ही उत्पन्न मिळू शकेल व सदर जागेवर अतिक्रमण न होता जागा सुरक्षित राहिल. याप्रमाणे कार्यवाही करण्यास संचालक मंडळाने मान्यता देऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

<u>ठराव</u>

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची पाचगणी येथील गट क्र.५४ व ५५ अंतर्गत दांडेघर पंपिंग स्टेशनची ३० गुंठे जागेपैकी नियमानुसार आवश्यक तेवढया जागेवर म.जी.प्रा. च्या मालकीचे विश्रामगृह बांधण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.२ :**

**विषय :** "ग्लोबल वॉटर समित २०१२" रोम, इटली येथे होणा-या आंतरराष्ट्रीय परिषदेस दि.३०.४.२०१२ ते दि.१.५.२०१२ या कालावधीत उपस्थित राहण्याकरिताच्या परदेश दौरा कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत.

मा. सदस्य सचिव यांनी वरील कार्यक्रम बाबीबाबत संचालक मंडळास अवगत केले. याबाबत मा. अध्यक्ष यांनी वरील परदेश दौऱ्यास मान्यता दिली असून, याबाबत सूचित केले की, यापुढील परदेश दौऱ्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता/उप अभियंता यांची परदेश दौऱ्यासाठी निवड करावी जेणे करुन पाणी पुरवठा योजना बाबतची माहिती घेऊन सदरचे तंत्रज्ञान म.जी.प्रा. राबवित असलेल्या योजनांमध्ये वापरता येईल. तसेच मा. मंत्री तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी पुढील दौऱ्यांच्या वेळी त्यांच्या सोबत खाजगी सचिव अथवा विशेष कार्य अधिकारी यांचाही दौऱ्यात समावेश करावा असे सूचित केले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन कार्यक्रम बाबीस मान्यता देऊन पुढील प्रमाणे ठरावा पारीत करण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, रोम, इटली येथे होणा-या 'ग्लोबल वॉटर समित २०१२', आंतराष्ट्रीय परिषदेस मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. व मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह अध्यक्ष म.जी.प्रा. यांच्या समवेत प्रधान सचिव, पा.पु. व स्व.विभाग, व सदस्य सचिव, म.जी.प्रा. तसेच अधीक्षक अभियंता (मुख्यालय),म.जी.प्रा., मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष यांचे विशेष कार्य अधिकारी व मा.मंत्री, ग्राम विकास तथा सह अध्यक्ष यांचे खाजगी सचिव यांना उपस्थित राहण्यास अनुमती देण्यांत येत असून परदेश दौ-याकरिता ६ व्यक्तींच्यां अंदाजे रु.२०.५६ लक्ष खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव, म.जी.प्रा., यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.३ :**

**विषय :** म.जी.प्रा.च्या नवी मुंबई येथील सिडको भवन या इमारतीमधील दुस-या व तिस-या मजल्यावरील कार्यालयांचे तसेच विश्रामगृहाचे नुतनीकरण, तसेच कन्हैयानगर ठाणे येथील नवीन प्रशासकीय इमारतीचे व विश्राम गृहाचे रंगकाम व इतर कामे करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीवर सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले की, म.जी.प्रा. ची मालकीच्या सिडको भवन व ठाणे येथे असलेली कार्यालयांचे नुतनीकरण करणे व दुरावस्थेत असलेल्या विश्रामगृहांच्या दुरुस्तीची कामे करणे अत्यावश्यक आहे. सदर कार्यक्रम बाबीबाबत सविस्तर चर्चा होऊन कार्यक्रम बाबीस मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा. ची मालकीच्या सिडको भवन इमारतीमधील दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयांचे नुतनीकरण व विश्रामगृहांची दुरुस्ती तसेच कन्हैयानगर, ठाणे येथील इमारतीचे रंगकाम व इतर दुरुस्तीची कामे करण्यासाठी मान्यता देण्यात येत असून यासाठी रु.२५८.१२ लक्ष इतक्या निधीची स्वतंत्र तरतूद सन २०१२-१३ च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये करावी. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेच्या कार्यक्रम बाब क्र. ४,५ व ६ :**

**क्र.४:** गोंदिया पेरी अर्बन टप्पा-२ पाणी पुरवठा योजनेच्या कामाची लोकवर्गणी मजीप्रामार्फत भरण्याबाबत.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

क्र.५: राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम:- २२४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सापन प्रकल्प उद्‌भव) योजनेसाठीची लोकवर्गणी माफ करणेबाबत.

क्र.६: राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम:- खारपण पट्ट्यातील १४० गावांसाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. जळगाव जामोद व संग्रामपूर जि. बुलढाणा योजनेसाठीची लोकवर्गणी माफ करणेबाबत.

सदरच्या आयत्या वेळेच्या कार्यक्रम बाबी या नियमित कार्यक्रम बाब क्र. १० शी निगडीत असल्याने व सदर प्रस्तावावर मा. मंत्री मंडळासमोर तसा प्रस्ताव सादर करुन मान्यता घेणे आवश्यक असल्याने, तसा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश संचालक मंडळाने दिले आहेत. यानुसार जो काही शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय होईल त्यानुसार सदरच्या तीन कार्यक्रम बाबींवर निर्णय घेणे योग्य ठरणार असल्याने, वेगळ्याने निर्णय घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

ठराव

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा. च्या आर्थिक स्थितीचा विचार करता १) गोंदिया पेरी अर्बन टप्पा-२ पाणी पुरवठा योजना, २) २२४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (सापन प्रकल्प उद्‌भव), ३) खारपण पट्ट्यातील १४० गावांसाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता. जळगाव जामोद व संग्रामपूर जि. बुलढाणा या योजनांसाठीची म.जी.प्रा. उपलब्ध करावयाची लोकवर्गणी एक विशेष बाब म्हणून माफ करुन त्याची तरतूद शासकीय अनुदानात करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात येत असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळची इतर चर्चा:**

१) मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, म.जी.प्रा. मालकीच्या नवी मुंबई परिसरात निवासस्थाने असून कांही निवासस्थाने विखूरलेली आहेत. सदर निवासस्थाने विकण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे. सदर निवासस्थाने विकण्याबाबतची लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व त्याचे अंतिमत: वाटप करण्यापूर्वी प्रस्ताव मान्यतेकरिता संचालक मंडळापुढे ठेवावा.

२) मा. मंत्री तथा अध्यक्ष यांनी असे सूचित केले की, पाण्याच्या टाक्यांवरील दर्शनी भागाचा वापर जाहिरातीसाठी करुन त्यातून उत्पन्न मिळू शकते का याची माहिती घेऊन योग्य तो निर्णय सदस्य सचिव, म.जी. प्रा. यांनी घ्यावा.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.